# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
दालन क्र.३५३, ३ रा मजला, मंत्रालय-विस्तार,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू,
चौक, मुंबई-४०० ०३२.

**सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता नामिकासूची (Panel) तयार करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता :**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील कामकाजाचा तसेच सेवा, आस्थापनाविषयक, माहिती व तंत्रज्ञान, विधानमंडळाशी संबंधित कामकाज, तसेच सहकार अधिनियमांशी संबंधित कामकाजाचा अनुभव असलेल्या (अराजपत्रित) संवर्गातील सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची खाली नमूद केलेल्या कामांसाठी आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी नामिकासूची (Panel) तयार करण्याचे प्रस्तावित आहे :-

| अ.क्र. | आवश्यक पदे | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | ०१ | १. साखर आयुक्तालयाची आस्थापना/प्रादेशिक कार्यालयाच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांची पदे चालू ठेवणे, मुदतवाढ, कार्यालयीन वृत्तपत्रे, टायपिंग मशिन खरेदी, स्टेशनरी इत्यादि.<br>२. ऊसविकास कार्यक्रम कारखान्यांच्या कार्यक्षमतेविषयक मापदंडाचे संनियंत्रण व साखर विभागाचा सर्वसाधारण आढावा.<br>३. झोनिंग (साखर कारखान्यांचे कार्यक्षेत्र).<br>४. सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालकाची नेमणूक/परदेश दौरे इत्यादि मुदतवाढ, वेतननिश्चिती.<br>५. ऊस खरेदी कर आणि त्यानुषंगाने येणारे विधानमंडळाशी संबंधित कामकाज |

**अटी व शर्ती :-**

१. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३.दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२. उमेदवार मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी /कर्मचारी असावा.

३. उमेदवारास उपरोक्त कामकाजाचा किमान ३ ते ५ वर्षांचा अनुभव असावा.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवारास तंत्रज्ञानाचे चांगले ज्ञान असावे.

६. उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

७. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.

८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

९. उमेदवाराने सदर पदाकरिता वेबसाईटवरील माहितीचे अवलोकन करुन nitin.gaikwad@nic.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून त्यांचे अर्ज १० दिवसांच्या आत सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२९३१३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

१०. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

११. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१३. निवड करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नामिकासूची तयार करून विवक्षित कामाची निकड विचारात घेऊन त्यांचेमधून आवश्यक कर्मचाऱ्यांची सेवा घेण्यात येईल.

१४. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

**उप सचिव,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**महाराष्ट्र शासन**

**दिनांक** :०५/०५/२०२६.
**ठिकाण** : मुंबई.